पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)
विशेष सर्वसाधारण सभा इतिवृत्त ----

दिनांक : ०२ / ०३ / २५
विषय : डेव्हलपर आणि सोसायटी यांच्यात होणाऱ्या डेव्हलपमेंट अॅग्रीमेंटच्या दिनांक २८/०२/२५, वर्जन २.५ च्या ड्राफ्टला सभासदांची मंजुरी घेणे.

संस्थेच्या सभासदांची विशेष सर्व साधारण सभा Development Agreement च्या वरील उल्लेखित ड्राफ्टला सभासदांची मंजुरी घेण्याकरिता दिनांक ०२/०३/२५ रोजी सकाळी १० वाजता, संस्थेच्या मधुकर जोशी सभागृहात श्री विजय सावंत यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली. या सभेला ७५ सभासद उपस्थित होते.

अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेची सूत्रं सचिव श्री विनायक पटवर्धन यांच्या कडे दिली. सचिवांनी विशेष सर्वसाधारण सभेचा विषय सर्वासमोर ठेवून स्पष्ट केले की काही सभासद डीए वर विचार करण्यास अजून वेळ द्यावा असे म्हणत असले तरी आजच चर्चा करुन निणय घेऊ.

या सभेत ड्राफ्ट आणि त्याच्या संबंधित अशा पॉइंट्स वर प्रदीर्घ चर्चा झाली ज्यात ऍड श्री किशोर जकाते, श्री श्रीवर्धन गाडगीळ, ऍड श्री जयंत शाळीग्राम, श्री गणेश शिरोडे, ऍड श्री अजय डोंगरे, श्री वसंत जोगदेव, श्री प्रदीप नेवाळकर, श्री राजाराम जोशी श्री विजय लेले, श्री अनंत बेदरकर आणि सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी त्यांचे विचार मांडले. चर्चेत बहुमताने असे ही ठरले की डीएच्या ड्राफ्टमधे खालील चार पॉइंट्स घालण्यात यावेत

१. सोसायटी ला ह्या एग्रीमेंट मधून बाहेर पडण्याचे काही वैध कारण पुढे उद्भवले तर त्या परिस्थितीत अॅग्रीमेंट मधून बाहेर पडण्यासाठी 'Exit Clause' ह्या ड्राफ्टमधे घालावा.
२. प्रोजेक्ट मधे दोन टॉवर्स आणि १२ डुप्लेक्स उभारली जाणार आहेत. त्या सर्वांची Construction Quality आणि वापरण्यात येणारे Material हे एकाच क्वालिटी आणि स्टँडर्डचे असावे.
३. Adjudication च्या वेळी जर काही नवीन मुद्दे लक्षात आले, जे आत्ताच्या डीए ड्राफ्ट च्या मूळ गाभ्यात बदल करत नाहीत, तर पंच समितीला बहुमताने तसे मुद्दे डीए ड्राफ्ट मधे घालण्याचे अधिकार असतील.
४. ही विशेष सर्वसाधारण सभा वर उल्लेख केलेला डीए ड्राफ्ट निष्पादित (execute) करण्यास पंच समिती पदाधिकाऱ्यांना अधिकृत करीत आहे.

हा प्रस्ताव ऐंड श्री जयंत शाळीग्राम यांनी मांडला तर श्री जयराम देसाई यांनी त्यांचे अनुमोदन केले.
ह्या नंतर सचिवांनी वरील सुधारणांसह Development Draft version 2.5 चा प्रस्ताव मतदाना साठी टाकला. यात प्रस्तावाच्या बाजूने ७२ आणि विरोधात ३ मते पडली. जी मतं मेल ने आली त्यात प्रस्तावाच्या पक्षात ५ तर विरोधात २ मतं होती. अशा प्रकारे हा प्रस्ताव ७७ विरुद्ध ५ मतांनी मंजूर झाल्याचे अध्यक्षांनी घोषित केले.
सर्वांचे आभार मानून अध्यक्षांनी विशेष सर्वसाधारण सभा संपल्याचे जाहीर केले.

विनायक पटवर्धन
सचिव